ePaper

# बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणी आणखी पाच जणांना अटक



| वर्ष - 8 । अंक -101 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- विराट कोहलीने घडवला इतिहास!
- पाकिस्तानने इंग्लंडचा उडवला धुव्वा
- जग्गी वासुदेव यांना सर्वोच्च दिलासा!
- कमला हॅरिस यांना मतदान करणार ना?

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 19 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## निवडून येण्याआधी सर्वजण मुख्यमंत्रिपदासाठी भांडण

# मविआचा पराभव नक्की!

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेः स्वार्थासाठी झालेल्या आघाडीत बिघाडी होणारच

। सातारा । महाईन्यूज

**महाविकास आघाडीकडे निवडून येण्याआधी सर्वजण मुख्यमंत्रिपदासाठी भांडत आहेत. त्यांचे पाय एकमेकांमध्येच अडकणार आहेत आणि त्यातूनच त्यांचा पराभव होणार आहे. ही स्वार्थासाठी झालेली आघाडी आहे. बाळासाहेबांचे विचार त्यागलेली आघाडी आहे. स्वार्थासाठी झालेली आघाडी असल्याने बिघाडी तर होणारच, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे बोलताना केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज साताऱ्यातील दरे (ता महाबळेश्वर) या त्यांच्या गावी आले होते. या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते.**



विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ आली, तरी विरोधक मुख्यमंत्रिपद आणि जागावाटपामध्ये अडकले आहेत. त्यांना त्यांचा पराभव समोर दिसायला लागला आहे. पराभव दिसू लागला, की मग दुसऱ्यांच्या त्रुटी शोधायला सुरुवात होते. त्यामुळे ते मतदारयादीमध्ये घोळ, महायुतीच्या विकासकामांमध्ये त्रुटी शोधत आहेत.

महायुतीची सत्ता येणार असल्याने मुख्यमंत्री नव्हे, तर विरोधकांनी विरोधी पक्षनेता ठरवावा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

शरद पवार मोठे नेते आहेत. त्यांच्या पक्षात जयंत पाटील आता पुढे पुढे करत आहेत. त्यामुळे सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड आणि पवार कुटुंबीयांना ते पचनी पडताना दिसेलच असे नाही. त्यामुळे या विषयी जास्त न बोललेले बरे. वेळ आल्यानंतर बऱ्याच गोष्टी समोर येतील, अशी टिप्पणी करत मुख्यमंत्री म्हणाले, की महायुतीची जागावाटपाची चर्चा अंतिम टप्प्यात आहे. आमच्यात कोणताही वाद नाही.

### महायुती सरकारला कामाची पोचपावती मिळेल

आम्ही निवडून येण्याला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. कुणाला किती जागा हे ठरवले जाईल. मागील दोन वर्षांमध्ये ४६ हजार कोटींच्या विविध योजना बळीराजासाठी केल्या आहेत. 'लाडकी बहीण' ही यशस्वी झालेली योजना आहे. अनेक योजना या सरकारने सुरू केल्या आहेत. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला केलेल्या कामाची पोचपावती महाराष्ट्रातील जनता देईल, असा आम्हाला विश्वास आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## जागा वाटप होईना, मुख्यमंत्रीपद ठरेना!

### महायुतीत चढाओढ, खासदार श्रीकांत शिंदे यांचे बैठकीचे आयोजन

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून पक्षस्तरीय बैठका सुरू झाल्या आहेत. २०१९ पेक्षा यंदाची राजकीय गणितं आणि समीकरणं वेगळी आहेत. आचारसंहिता लागू होऊन चार दिवस उलटले तरी जागा वाटप जाहीर झालेलं नाही. तसंच, महायुती आणि महाविकास आघाडीकडून मुख्यमंत्री पदाचा चेहराही उलगडू दिलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या गादीवर आता कोण बसणार असा प्रश्न निर्माण होतोय. मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्याबाबत महाविकास आघाडीत विसंगती असून महायुतीतही अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचं सातत्याने समोर येतंय. दरम्यान, शिवसेना पक्ष (एकनाथ शिंदे) यांच्या पक्षस्तरीय बैठकीत नेत्यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करा, अशी मागणी केली. नेते आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मिलिंद देवरा, रवींद्र वायकर, मनीषा कायंदे, राहुल शेवाळे आदी नेते उपस्थित होते. एएनआय या वृत्तसंस्थेने याबाबत माहिती दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदासाठी चेहरा म्हणून सादर करा, अशी जोरदार मागणी या बैठकीतून करण्यात आली. मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत भगवा झेंडा अभिमानाने फडकवत राहा, असं शिवसेना नेत्यांनी म्हटलं आहे. आमदार दिलीप लांडे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक करत नाथांचे नाथ, एकनाथ शिंदे आहेत, अशी घोषणाबाजी केली.

### श्रीकांत शिंदे काय म्हणाले?

"फक्त एक महिना काम करायचं आहे. आपल्याला महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचं सरकार आणायचं आहे. आपल्याला फक्त लोकांपर्यंत जाऊन सरकारी योजनांची माहिती द्यायची आहे. आज राज्यातील वातावरण अतिशय गढूळ आहे. काहीही असो. विरोधक कितीही शिव्या देऊ द्या, एकनाथ शिंदे यांच्यावर जनतेचे प्रेम आहे. चांदीचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या लोकांना जनतेचे प्रश्न कळणार नाहीत", असं खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले.

# पुण्यात आता हेल्मेटसक्ती!

## सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे निर्देश

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहन अपघातात निष्पाप नागरिकांचे बळी जाऊ नयेत यासाठी सर्व संबधित यंत्रणांनी रस्ते सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती अभय सप्रे यांनी दिले. प्रशासनाने दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती करावी, असे त्यांनी बजाविले.**



विधान भवन येथे आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, विभागीय आयुक्तालयाच्या उपायुक्त वर्षा लड्डा ऊंटवाल, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर, पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, पिंपरी चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण आदी उपस्थित होते.

बेदरकारपणे आणि बेजबाबदारपणे वाहने चालवून निष्पाप नागरिकांच्या बळींच्या संख्येत वाढ होत आहे ही गंभीर बाब आहे, असे सांगून न्यायमूर्ती सप्रे म्हणाले की, रस्ता अपघात कमी व्हावे, अपघातातील जखमींना तातडीने वैद्यकीय उपचार मिळावे, बळींची संख्या कमी व्हावी याची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली केली असून सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली रस्ता सुरक्षा समिती स्थापन केली आहे.

### वाहतूकीचे नियम स्वयंस्फूर्तीने पाळणे आवश्यक

निष्पाप नागरिकांच्या रस्ते अपघातात बळींची संख्या लक्षात घेता परिवहन विभाग, पोलीस विभाग तसेच सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी सकारात्मकतेने काम करावे. अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक बजावण्याबरोबरच निस्वार्थ भावनेने काम करावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन रस्ता सुरक्षेसंबधी नियमांची कठोरपणे अंमलबजावणी करावी. अपघातातील बळींची संख्या कमी होण्यासाठी प्रयत्न करावे. या बैठकीत दिलेल्या निर्देशांचे सर्व संबधित यंत्रणांनी गांभीर्यपूर्वक पालन करावे. वाहनांच्या संख्येत वाढ होत असल्याने रस्ता सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनीही वाहतूकीचे नियम स्वयंस्फूर्तीने पाळणे आवश्यक आहे. रस्त्यावर चालविण्यात येणारे वाहन सुस्थितीत असावे, वाहनचालकांनी सीट बेल्ट लावावे, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलू नये, अतिवेगाने वाहन चालवू नये, मद्यप्राशन करुन वाहन चालवू नये, वाहन परवाना तसेच वाहन व वाहनचालकांनी सुरक्षा विमा वेळोवेळी नुतनीकरण करावे, रस्ता सुरक्षा उपाययोजनांची माहिती करुन घ्यावी, त्यासाठी स्वतःहून पुढाकार घ्यावा, वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशा सूचना न्यायमूर्ती सप्रे यांनी केल्या.

# आयात उमेदवाराचे आम्ही काम करणार नाहीत

## शिवसेना ठाकरे गटाचा सर्वानुमते ठराव, पक्ष काय भूमिका....

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्हाला विचारात न घेता कुणाचा शिवसेना ठाकरे गटात पक्षप्रवेश झाल्यास त्या आयात उमेदवाराचे आम्ही काम करणार नाहीत. असा ठराव पिंपरी- चिंचवड शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने आज आकुर्डी येथील सेना भवन मध्ये करण्यात आला.**







शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले, संजोग वाघेरे, सुलभा उबाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. अजित पवार गटाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांचा ठाकरे गटात प्रवेश होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक पार पडली. भोंडवे यांच्या प्रवेशाला पिंपरी- चिंचवडच्या शिवसैनिकांनी विरोध केला आहे.गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गटात जोरदार इन्कमिंग सुरू आहे. अनेक इच्छुक नेत्यांनी पक्षप्रवेश केलेला आहे. आज देखील चिंचवड विधानसभा मतदारसंघातून अजित पवार गटाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे हे ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. या प्रवेशाबाबत पक्षश्रेष्ठीने स्थानिक शिवसैनिकांना विश्वासात न घेतल्याने त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आकुर्डी येथील सेना भवन मध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीला शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह संजोग वाघेरे, सुलभा उबाळे आणि पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.आयात उमेदवाराला उमेदवारी दिल्यास त्या उमेदवाराचं काम करायचं नाही. असा ठाकरे गटाच्या वतीने ठराव करण्यात आला आहे. निष्ठावंत शिवसैनिकांवर हा अन्याय असल्याचं सचिन भोसले यांनी म्हटल आहे. कुणी पक्ष वाढीसाठी पक्ष प्रवेश करत असेल तर आम्ही त्याचं स्वागत करतो. परंतु, कुणी उमेदवारीसाठी पक्षात प्रवेश करत असेल तर आम्ही त्या व्यक्तीचं काम करणार नाहीत. असा सर्वानुमते ठराव झाल्याची माहिती शहराध्यक्ष सचिन भोसले यांनी दिली आहे. शिवसेना ठाकरे गटात पक्ष प्रवेश करणाऱ्या मोरेश्वर भोंडवे यांना पक्षश्रेष्ठी उमेदवारी देणार का?, बघावं लागेल. शिवसेना ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले, संजोग वाघेरे, सुलभा उबाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. अजित पवार गटाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांचा ठाकरे गटात प्रवेश होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक पार पडली. भोंडवे यांच्या प्रवेशाला पिंपरी- चिंचवडच्या शिवसैनिकांनी विरोध केला आहे.गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गटात जोरदार इन्कमिंग सुरू आहे. अनेक इच्छुक नेत्यांनी पक्षप्रवेश केलेला आहे.

### त्या उमेदवाराचं काम करायचं नाही

विधानसभा मतदारसंघातून अजित पवार गटाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे हे ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. या प्रवेशाबाबत पक्षश्रेष्ठीने स्थानिक शिवसैनिकांना विश्वासात न घेतल्याने त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आकुर्डी येथील सेना भवन मध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीला शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह संजोग वाघेरे, सुलभा उबाळे आणि पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.आयात उमेदवाराला उमेदवारी दिल्यास त्या उमेदवाराचं काम करायचं नाही. असा ठाकरे गटाच्या वतीने ठराव करण्यात आला आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार गटाला धक्का

# मोरेश्वर भोंडवे यांच्या हाती "मशाल"!

### निवडणूक लढवण्याचा निर्धार : चिंचवडची जागा भाजपाला जाणार म्हणून नाराजी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवडमधून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले राष्ट्रवादीचे (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक, शहर कार्याध्यक्ष मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश केला. त्यामुळे शहर राष्ट्रवादीला हा धक्का असल्याचे मानले जात आहे.**



मोरेश्वर भोंडवे हे दोन वेळा महापालिकेत नगरसेवक राहिले आहेत. २०१४ मध्ये भोंडवे यांनी चिंचवड विधानसभेची अपक्ष निवडणूक लढविली होती. यावेळी त्यांनी पुन्हा निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. भोंडवे यांच्यासह चार माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेत चिंचवडची जागा भाजपकडून सोडवून घेण्याची मागणी केली होती. मात्र, पवार यांनी मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे या माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचीही भेट घेतली होती.

महाविकास आघाडीत ज्या पक्षाला चिंचवडची जागा सुटेल, त्या पक्षात प्रवेश करणार असल्याचेही या माजी नगरसेवकांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत चिंचवडची जागा शिवसेना (ठाकरे) पक्षाला सुटल्याचे बोलले जात आहे. तर, पिंपरी आणि भोसरी विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला सुटल्याची चर्चा आहे. दरम्यान, राष्ट्रवादीतील इतर माजी नगरसेवकांचा चिंचवडमध्ये मेळावा घेऊन प्रवेश होणार असल्याचे भोंडवे यांनी सांगितले.

> "विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी मी इच्छुक आहे. महायुतीत चिंचवडची जागा राष्ट्रवादीला (अजित पवार) घेण्याची मागणी केली होती. परंतु, नेतृत्वाकडून कोणतेही उत्तर आले नाही. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून शिवसेनेत प्रवेश केला.
> **- मोरेश्वर भोंडवे,** माजी नगरसेवक.

---

## आमदार अश्विनी जगताप यांचा ग्रीन सिग्नल : उमेदवारीचा मार्ग मोकळा

### चिंचवडमध्ये आता भाजपाचा निनाद "शंकरा रे शंकरा..!"

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातील आगामी निवडणुकीत महायुतीचा उमेदवार कोण असणार यावरून अनेक दिवसांपासून तर्कवितर्क लढवले जात होते. मात्र या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. भाजपचे दिवंगत नेते लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनी पोट निवडणूक लढवली आणि जिंकली होती. मात्र आता आगामी निवडणुकीमध्ये कोण उमेदवार असणार यावरून अनेक चर्चा रंगल्या होत्या. मात्र आज खुद्द आमदार अश्विनी जगताप यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे पुणे दौऱ्यावर असताना त्यांची भेट घेतली आणि माझे दीर आणि भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना उमेदवारी द्या, अशी विनंती केल्याने भाजपचे पुढचे उमेदवार शंकर जगताप असणार हे आता जवळपास निश्चित मानले जात आहेत.**

दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर पोटनिवडणुकी वेळी देखील शंकर जगताप यांचे नाव पुढे येत होतं मात्र अश्विनी जगताप यांनी निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केल्याने भाजप श्रेष्ठींनी अश्विनी जगताप यांच्या नावाला पसंती देत त्यांना उमेदवारी दिली होती. त्यानंतर अश्विनी जगताप ह्या मोठ्या फरकाने विजयी देखील झाल्या होत्या. या निवडणुकीमध्ये शंकर जगताप यांनी मोठी कामगिरी बजावली होती.

दरम्यान, अश्विनी जगताप आमदार झाल्यानंतर पुढची निवडणूक कोण लढणार यावरून जगताप कुटुंबीयांमध्ये वाद असल्याच्या चर्चा रंगल्या याचं कारण म्हणजे शंकर जगताप यांनी खुलेआम निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे जगताप कुटुंबीयांमध्ये एकमत नाही, असा संदेश बाहेर गेला. मात्र आता खुद्द अश्विनी जगताप यांनीच एक पाऊल मागे घेत त्यांचे दीर शंकर जगताप यांच्या नावाची शिफारस थेट प्रदेशाध्यक्षांकडे केल्यामुळे या वादाला आणि चिंचवडचा महायुतीचा उमेदवार कोण असणार या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

**भाजपाची उमेदवारी निश्चित...**

पोटनिवडणूक वेळी शंकर जगताप यांची देखील आमदारकी लढविण्याची इच्छा होती. मात्र त्यांना तेव्हा संधी दिली गेली नाही त्याबदल्यात त्यांना त्यावेळी पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपद देण्यात आलं आणि तेव्हापासूनच पुढील निवडणुकीची तयारी म्हणून त्यांना ताकद देण्याचे काम भाजपकडून करण्यात आलं होतं. आज त्या शंकर जगताप यांना भाजप कडून उमेदवारीची दाट शक्यता आहे. दुसरीकडे चिंचवड विधानसभा मतदारसंघात जगताप कुटुंबीय सोडले तर इतर ताकतीचा असा कुठलाच मोठा पर्याय भाजपकडे नाही. सध्या भाजपचे शत्रुघ्न काटे व चंद्रकांत नखाते हे देखील आपला प्रचार करत असले तरी भाजपकडून शंकर जगताप यांनाच उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चित झाल आहे.





**अधिकृत उमेदवारीची अद्याप प्रतीक्षा....**

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघातून शंकर जगताप हे उमेदवार असतील मात्र महाविकास आघाडी कडून कुठला उमेदवार असणार हे चित्र अद्याप अस्पष्ट आहे. राष्ट्रवादीकडून नाना काटे यांनी निवडणूक लढवली होती. मात्र, तेच नाना काटे आज महायुतीतील घटक पक्ष असलेल्या अजित पवारांचे राष्ट्रवादमध्ये आहेत. मात्र काही झालं तरी भाजपचा काम करणार नाही आणि निवडणूक लढवणारच असा पवित्रा त्यांनी घेतल्याने ते काय निर्णय घेतात हे पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र, तूर्तास शंकर जगताप हे अधिकृत उमेदवारीच्या यादीची वाट बघत आहेत.

# दिएगो गार्सिया बेट पुन्हा चर्चेत




**हिंद महासागरात दिएगो गार्सिया हे एक महत्त्वाचे बेट आहे. ते विविध कारणांमुळे सतत चर्चेत असते. भारतापासून फार लांब नसलेल्या या बेटावर अमेरिकेचा लष्करी तळ आहे. त्याला सामरिक महत्व आहे. अलीकडे चीनच्या नौदलाची जहाजे तिथे मोठ्या प्रमाणात दिसू लागली आहेत. त्यामुळेदेखील अमेरिकासाठी हे बेट महत्त्वाचे आहे. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही दिएगो गार्सियाला महत्व आहे.**



१९७१ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धातही दिएगो गार्सिया चर्चेत असे. आता ३ ऑक्टोबरला ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये झालेल्या एका सामंजस्य करारामुळे दिएगो गार्सिया पुन्हा चर्चेत आले आहे. अनेक वर्षांचा वाद आणि दोन वर्षांच्या वाटाघाटींनंतर चागोस द्वीपसमूहाबद्दल दोन्ही राष्ट्रांत हा करार झाला आहे. जवळपास ६० बेटांच्या या द्वीपसमूहात सर्वात मोठा आहे दिएगो गार्सिया. या बेटावरच लोक राहतात. या करारामुळे ब्रिटनने चागोस द्वीपसमुहावर पूर्व आफ्रिकेच्या मॉरिशस या देशाचा सार्वभौम अधिकार असल्याचे मान्य केले आहे. पण, दिएगो गार्सियावर ब्रिटनचे नियंत्रण राहणार आहे. १९६८ मध्ये ब्रिटनच्या ताब्यातून मॉरिशस स्वतंत्र झाला. पण, त्यापूर्वी ब्रिटनने १९६५ मध्ये चागोस द्वीपसमूहाला मॉरिशसपासून वेगळे करून ब्रिटिश इंडियन ओशन टेरिटरी असे नाव दिले. चागोसवर मॉरिशसचा सार्वभौम अधिकार असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने २०१९ आणि २०२१ मध्ये मान्य केले. तर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने (आयसीजे) २०२२ मध्ये मॉरिशसचे म्हणणे मान्य केले. सुरुवातीला ब्रिटनला संयुक्त राष्ट्रांचे मत आणि आयसीजेचा निकाल मान्य नव्हता. आयसीजेने मात्र सल्ला दिला असल्याचे ब्रिटनचे म्हणणे होते. ब्रिटन आणि मॉरिशसने चागोस द्वीपसमुहावर मॉरिशसचे संपूर्ण सार्वभौमत्व राहील, असे एका संयुक्त-निवेदनातून जाहीर केले आहे. हा एक ऐतिहासिक राजकीय सामंजस्य करार असल्याचे उभय देशांनी म्हटले आहे. यापुढे ९९ वर्षे अमेरिकेचा लष्करी तळ दिएगो गार्सिया येथे कायम राहील, हेदेखील स्पष्ट झाले आहे. यातूनही दिएगो गार्सियाचे सामरिक महत्त्व लक्षात येते. भारताने या कराराचे स्वागत केले आहे. अनेक वर्षांपासून चागोस द्वीपसमुह मॉरिशसला परत करण्यात यावा, ही भारताची भूमिका आहे. १९६० च्या सुमारास चागोस येथे राहणाऱ्या काही लोकांनी मात्र या करारावर टीका केली आहे. नुकसान भरपाई देण्यात यावी आणि चागोस येथे परत जाण्याचा अधिकार मिळावा, अशी त्यांची मागणी आहे. वाटाघाटीत आपल्याला सहभागी करून घेतले नाही, याविषयी त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.युरोपीय येण्यापूर्वी हिंद महासागरातील चागोस द्वीपसमूहावर कोणीगी राहत नव्हते. १५१२ मध्ये पोर्तुगीजांनी दिएगो गार्सियाचा शोध लावला. फ्रेंच आणि नंतर ब्रिटिश तिथे आले. फ्रेंचांनी १७१५ मध्ये चागोस कब्जात घेतले. तोपर्यंत तिथे कोणी राहत नव्हते. ब्रिटनने १८१४ मध्ये चागोस द्वीपसमूहावर कब्जा केला. या द्वीपसमुहाचे महत्त्व लक्षात आल्यावर ब्रिटनने आफ्रिका आणि भारतातून मजूर आणले. मोठ्या प्रमाणात नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली. नारळातून लोकांना पैसे मिळायला लागले. या व्यतिरिक्त मासे पकडण्याचा व्यवसाय सुरू झाला. वस्तीदेखील हळूहळू वाढत होती. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ही वस्ती १,००० हून अधिक झाली.

सामरिक महत्वामुळे अमेरिकेच्या विनंतीवरून ब्रिटनने येथील १,५०० हून अधिक लोकांच्या स्थलांतरास सुरुवात केली. १९६७ ते १९७३ दरम्यान या लोकांना बळजबरीने मॉरिशस आणि सेशेल्स येथे पाठविण्यात आले. यादरम्यान, ब्रिटनने मॉरिशसला स्वातंत्र्य दिले. ब्रिटनने अतिशय हुशारीने ही हकालपट्टी केली होती. सुरुवातीला काही कामासाठी मॉरिशस किंवा सेशेल्स किंवा इतरत्र गेलेल्या लोकांना परत द्विपसमूहात येऊ दिले नाही. त्यानंतर बाहेरून येणाऱ्या वस्तू बऱ्याच मर्यादित करण्यात आल्या.१९७३ पर्यंत मॉरिशस येथे जवळपास १,५०० लोकांचे आणि सेशेल्स येथे २३२ लोकांचे पुनर्वसन करण्यात आले.ब्रिटनने १९६६ मध्ये अमेरिकेला दिएगो गार्सिया ५० वर्षांसाठी दिले. नंतर २० वर्षे वाढवण्याचीही त्यात तरतुद होती. तेव्हापासून अमेरिकेने तिथे हळूहळू लष्करी तळ उभारला. आज तिथे अंदाजे २,५०० कर्मचारी काम करत आहेत. ते प्रामुख्याने अमेरिकन आणि ब्रिटिश आहेत.

## प्रासंगिक »

### भ्रष्ट करिता सायास

***“सरकारी मालकीची साधनसंपत्ती यापुढे लिलावातूनच विका” असा अर्थाचा दंडक सर्वोच्च न्यायालयाने घालून दिला; तो पाळण्यात विद्यमान सत्ताधारी भाजपस रस नाही...***

मनमोहन सिंग सरकारातील दूरसंचारमंत्री ए. राजा हे त्यातील मुख्य आरोपी. हा ‘घोटाळा’ (?) कसा झाला हे आठवणे आता मनोरंजक ठरेल. याचे कारण दूरसंचारातील ज्या निर्णयांमुळे भ्रष्टाचार झाला असे तत्कालीन विरोधी पक्ष भाजपस त्या वेळी वाटले तोच मार्ग सत्ताधारी असलेल्या भाजपने दूरसंचारासाठी आत्ता निवडलेला असून त्या वेळी ज्या मार्गास खासगी कंपन्यांचा विरोध होता तोच मार्ग आता खासगी कंपन्यांस हवाहवासा वाटू लागला आहे. दूरसंचार क्षेत्रातील या बदलत्या कंपनलहरी समजून घेणे आवश्यक. ‘त्या’वेळी दूरसंचारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भाजपने केला कारण तत्कालीन दूरसंचारमंत्री राजा यांनी दूरसंचारासाठीची आवश्यक कंपनलहरींची (स्पेक्ट्रम) कंत्राटे प्रशासकीय अधिकारात दिली. त्यांचा लिलाव केला नाही.

पावसाळा संपला की धूळ, मग धूर, हिवाळ्यात धूरमिश्रित धुके किंवा ‘धुरके’ यांचे साम्राज्य पसरू लागते, मग हवा-प्रदूषणाबद्दल पुन्हा चर्चा सुरू होते! तज्ज्ञांनी सुचविलेल्या उपायांची प्रचंड संख्या असूनही, परिस्थिती तशीच राहाते. वास्तविक समस्या काय आहे ते सर्वांना नीट माहीत आहेच.

# प्रदूषणाच्या बळींची आकडेवारी उपलब्ध व्हावी...

तरीही, हवा-प्रदूषणाचा आरोग्यावर होणारा परिणाम रोखण्यासाठी उपाय शोधणे सोपे नाही, असेच वारंवार, वर्षानुवर्षे का होते आहे?‘मोठ्या शहरांतील सुमारे सात टक्के मृत्यू हे हवा-प्रदूषणामुळे होतात हे खरे आहे काय? असल्यास, हे अपमृत्यू रोखण्यासाठी सरकार कोणते उपाय योजणार आहे?’ अशा आशयाचा प्रश्न जुलैमध्ये राज्यसभेत विचारला गेला होता. त्यावर ‘एनडीए’ सरकारमध्ये आरोग्य व कुटुंबकल्याण खात्याच्या राज्यमंत्री असलेल्या अनुप्रिया पटेल यांनी दिलेले उत्तर असे की, ‘हवा प्रदुषण आणि मोठ्या शहरांतील मृत्यू यांचा थेट संबंध प्रस्थापित करू शकणारी आकडेवारी उपलब्ध नाही’... मात्र याच प्रश्नातल्या पुढल्या भागाचा आधार घेऊन, हवा-प्रदूषण रोखण्यासाठी हे सरकार कसे कटिबद्ध आहे, हे सांगताना हवा-प्रदूषण रोखण्यासाठी सरकारने सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती राज्यमंत्री पटेल यांनी दिली. अशाच प्रकारची उत्तरे



आपण यापूर्वीही ऐकलेली आहेत... मग ती कोविडबळींची संख्या असो की कुपोषणबळींची... सरकारकडे नेमका आकडा नसतोच आणि तरीही सरकार कटिबद्ध असतेच.पण हवा-प्रदूषणाने जाणाऱ्या ‘सात टक्के’ बळींविषयीच्या उत्तरात आणखीही एक गोम आहे. ती चलाखी सहजासहजी नाकारताही येत नाही, ही तिची खासियत. ती अशी की, मरणाशी ‘थेट संबंधा’वर भर द्यायचा आणि ‘थेट संबंध’ नाकारायचा! समुद्रात बुडून अथवा अपघातात जीव जातो तेव्हा थेट संबंध जोडण्याशिवाय पर्यायच नसतो, पण हवा-प्रदूषणाचे बळी हे कदाचित त्यांना सिगारेट/दारूसारखी व्यसने असल्याने, किंवा त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयी योग्य नसल्याने, किंवा आनुवंशिक दोषांमुळेच, कामावरल्या तणावामुळेच किंवा हृदयविकार/कर्करोग आदींमुळेही गेले असतील, असे म्हणता येते. यावत तज्ज्ञांकडे काही उत्तर आहे का?आहे. अत्यंत तार्किक असे ते उत्तर आहे. प्रकृतीवर हळुहळू किंवा कालान्तराने परिणाम घडवत मृत्यूकडे ढकलणारे कोणतेही कारण हे अन्य कारणांशीही जोडलेले असू शकते, असा तो तर्क. परंतु अन्य कारणे (व्यसनांपासून ते विकारांपर्यंत) समान असूनही विशिष्ट कारण अधिक घातक ठरते की नाही, हे महत्त्वाचे. तज्ज्ञांचे हे उत्तर अन्य संदर्भात मान्यही झालेले आहे. उदाहरणार्थ, तंबाखू हे कर्करोगाचे एकमेव कारण असू शकत नाही, यासारखे युक्तिवाद न करता ‘तंबाखू सेवन कर्करोगाचे कारण’ हा तंबाखूयुक्त व्यसनपदार्थांच्या आवरणांवर असलेला संदेश जनजागृतीसाठी आहे, हे मान्य केले जाते. अशा संदेशांची गरज आहे, ही समाजमान्य असते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राऊत उद्धव ठाकरेंपेक्षा मोठे नेते!

## राऊत-पटोले यांच्यात जागावाटपावरून खटके उडत आहेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे जागावाटपाच्या चर्चेसाठी उपस्थित असतील तर आम्ही बैठकीला येणार नाही, अशी भूमिका शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या वतीने घेण्यात आल्याची चर्चा आज दिवसभर रंगली होती. या चर्चेवर नाना पटोले यांनी नाराजी व्यक्त केली. उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून कुणीही अशी भूमिका मांडलेली नसताना माध्यमांमध्ये चुकीच्या बातम्या प्रसारित होत आहेत, असे ते म्हणाले. आमच्यात उत्तम समन्वय आहे. पण भाजपात मारामाऱ्या सुरू आहेत. त्याच्या बातम्या का केल्या जात नाहीत? असा प्रतिप्रश्न त्यांनी विचारला.**



संजय राऊत यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना नाना पटोले म्हणाले, “संजय राऊत हे कदाचित उद्धव ठाकरे साहेबांपेक्षा मोठे नेते असतील. त्यांना उद्धव ठाकरेंशी बोलावे लागत नसेल. पण आमच्या पक्षात एक प्रोटोकॉल आहे. आमचे पक्षश्रेष्ठी दिल्लीत आहेत. आम्हाला सर्व निर्णयांची माहिती त्यांना द्यावी लागते. तिकडे जयंत पाटील यांना सर्व माहिती शरद पवारांना द्यावी लागते. कदाचित शिवसेनेत ही पद्धत नसेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे.”संजय राऊत आणि नाना पटोले यांच्यात जागावाटपावरून खटके उडत आहेत. यावर शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनाही प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की, मी याबाबत माहिती घेऊन नंतर बोलेन. विदर्भातील जागेवरून मतभेद आहे. यावरून काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींशी काही काही बोलणे झाले आहे का? याबद्दल प्रश्न विचारला असता ते म्हणाले की, एकापेक्षा जास्त पक्ष जेव्हा एकत्र निवडणूक लढवित असतात, तेव्हा जागावाटपावरून थोडीशी खेचाखेची होते. पण ती तुटेपर्यंत ताणायची नाही, हे सर्व पक्षांनी लक्षात ठेवायला हवे. पण मोठा तंटाबखेडा झाला, असे वाटत नाही.जागावाटपावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच आहे का? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनाही विचारण्यात आला. यावर ते म्हणाले की, जागावाटपावरून कोणताही वाद नाही. शेवटी राजकीय जीवनातील भीष्माचार्य हे महत्त्वाची भूमिका बजावतील. पक्षांमध्ये कोणतेही वाद नाहीत. दोन नेत्यांमध्ये खटके उडाले आहेत. पण त्याने महाविकास आघाडीला कोणतेही नुकसान होणार नाही.’उद्याचा प्रगत महाराष्ट्र घडविण्याचे, चुकीच्या दिशेने चाललेल्या राज्याला सावरण्याचे सामर्थ्य आणि तसे नेतृत्व जयंतरावांकडे आहे’, असे शरद पवार यांचे शब्द होते.

क्रांतिकारकांचा, स्वातंत्र्यसेनानींचा वारसा जपणाऱ्या जयंतरावांवर राज्य सावरण्याची जबाबदारी मी टाकत आहे, असेही पवार यांनी स्पष्ट केले.बुधवारी रात्री इस्लामपूर येथे भरपावसात शिव स्वराज्य यात्रेची सांगता सभा झाली. मुसळधार पावसानंतरही सभेला तुफान गर्दी होती. शरद पवार यांनी दिलेल्या संकेतामुळे मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत आमदार जयंत पाटीलही असतील, यावर मंथन सुरू झाले. शरद पवार यांच्यासह आ. जयंत पाटील व राष्ट्रवादीचे अन्य नेते मंचावर येताच आ. जयंत पाटील यांच्या नावाचा ‘भावी मुख्यमंत्री’ म्हणून जयघोष सुरू झाला. ते भाषणासाठी उभेराहिल्यावरही उपस्थितांमधून पुन्हा असा जयघोष सुरू झाला.याच भागाच्या सुपुत्राच्या हातामध्ये महाराष्ट्र बहरण्याची, महाराष्ट्र सावरण्याची आणि महाराष्ट्र पुढे नेण्याची जबाबदारी आपण टाकतोय. मी आणि राष्ट्रवादीचे आमचे सर्व सहकारी आणि महाराष्ट्राची तरुण पिढी शक्तिनिशी त्यांच्या पाठीशी उभी राहील, हा दिलासा आणि विश्वास याठिकाणी देतो, असे खा. शरद पवार यांनी सांगितले. कोल्हे म्हणाले, खा. पवार यांच्याकडून प्रेरणा घेऊन आम्ही लढत राहिलो. ही लढाई महाराष्ट्र धर्म वाचविण्याची आहे. अनेकांना वाटत होते, पक्ष गेला, चिन्ह गेले. ज्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले, ते नेते बाजूला गेले. आता पक्ष शिल्लक राहणार नाही, अशी स्थिती होती.

### मुख्यमंत्री : संख्या बळानुसार

सभेच्यावेळी आलेल्या पावसाचेही सांगणे आहे की, जयंत पाटील यांनी ‘वर्षा’ बंगल्यावर जावे, ती वेळ आली आहे.दरम्यान, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. शरद पवारांच्या वक्तव्यावर काँग्रेसनेही सावध प्रतिक्रिया दिली आहे. जयंत पाटील यांच्यात मुख्यमंत्री होण्याची क्षमता आहे, असे शरद पवारांनी म्हणण्यात वावगे काही नाही. याला मुख्यमंत्रिपदासाठी एखादे नाव पुढे करणे असल्याचे म्हणता येणार नाही. निकालानंतर संख्याबळानुसार मुख्यमंत्री ठरेल. काँग्रेस पक्षात हा निर्णय राज्य पातळीवर नव्हे तर नवी दिल्लीत पक्षश्रेष्ठींच्या पातळीवर निर्णय घेतला जाईल, असे ज्येष्ठ काँग्रेस नेते व माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

---

# शरद पवारांनी दाऊद इब्राहिमची भेट घेतली होती

## शरद पवार यांच्या दौऱ्याला सरकारची मान्यता होती का?

। अमरावती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री असताना शरद पवार यांनी दुबई विमानतळावर दाऊद इब्राहिमची भेट घेतली होती, असा खळबळजनक दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. तसेच या भेटीदरम्यान दाऊदने शरद पवार यांना सोन्याचा हार दिला, असेही ते म्हणाले. प्रकाश आंबेडकर यांच्या दाव्यानंतर आता खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे.**



यावरून आता पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.१९८८ ते १९९१ दरम्यान शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री होते, या काळात शरद पवार लंडनला गेले होते. तिथून कॅलिफोर्नियाला गेले, तिथे २ दिवस थांबले. कॅलिफोर्नियात त्यांनी एक बैठक घेतली.

तिथून शरद पवार लंडनला परत आले. तिथून दोन दिवसांनी ते दुबईला गेले. दुबई एअरपोर्टवर त्यांची दाऊद इब्राहिमबरोबर भेट झाली, दाऊदने त्यांना सोन्याचा हार भेट दिला, तिथून शरद पवार पुन्हा लंडनला गेले आणि भारतात परतले”, असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला. केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय कोणत्याही मुख्यमंत्र्याला विदेशात जाता येत नाही. त्यामुळे शरद पवार यांच्या दौऱ्याला त्यावेळच्या सरकारची मान्यता होती का? कॅलिफोर्नियात शरद पवार यांनी जी बैठक घेतली त्याची माहिती तत्कालिन केंद्र सरकारला होती.

### इतिहास आपल्याला पाहायला हवा

शरद पवार आणि दाऊद इब्राहिमच्या भेटीची सरकारला माहिती होती का? याची उत्तर केंद्र सरकारने दिली पाहिजे”, अशी मागणीही त्यांनी केली.पुढे बोलताना ते म्हणाले, “राज्यात शांतता राखायची असेल तर अशा पक्षांना मतदान करायचे की नाही, हे जनतेला ठरावावं लागेल. निवडणुकीच्या तोंडावर मी हे आरोप करतो आहे, कारण राज्यात १९९० आणि २००० दशकाची परिस्थिती पुन्हा येईल, असं दिसते आहे. गोळीबारीच्या अनेक घटना घडल्या आहेत. बाबा सिद्दीकींची उघडपणे हत्या करण्यात आली आहे. ही परिस्थिती पाहता मागचा इतिहास आपल्याला पाहायला हवा

# जग्गी वासुदेव यांना सर्वोच्च दिलासा!

## दोन महिला स्वच्छेने त्या आश्रमात राहत आहेत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'सद्गुरू' जग्गी वासुदेव यांच्या 'ईशा फाऊंडेशन'च्या कोइम्बतूर आश्रमात दोन बहिणींना बळजबरीने डांबून ठेवल्याबद्दल त्यांच्या वडिलांनी हेबियस कॉर्पस याचिका मद्रास उच्च न्यायालयात दाखल केली होती. यानंतर मद्रास उच्च न्यायालयाने पोलिसांना आश्रमाची झडती घेण्याचे आदेश दिले होते. या कारवाईनंतर 'ईशा फाऊंडेशन'ने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन याविरोधात याचिका दाखल केली होती. अखेर आज सर्वोच्च न्यायालयाने कामराज यांची हेबियस कॉर्पस याचिका फेटाळून लावत सद्गुरू जग्गी वासुदेव यांना मोठा दिलासा दिला.**



निवृत्त प्राध्यापक डॉ. एस. कामराज यांनी मद्रास उच्च न्यायालयात कोईम्बतूरमधील ईशा फाऊंडेशनच्या आश्रमाविरोधात तक्रार दाखल केली होती. गीता (४२) आणि लता (३९) या दोन मुलींना आश्रमात बळजबरीने डांबून ठेवल्याचा आरोप त्यांनी केला होता. सदर याचिका फेटाळत असताना भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाच्या कामकाजावर ताशेरे ओढले आहेत. दोन महिला स्वच्छेने त्या आश्रमात राहत आहेत, हे त्यांनी सांगितल्यानंतरही उच्च न्यायालयाने याचिका फेटाळून लावण्याऐवजी आपले कार्यक्षेत्र ओलांडून निर्णय घेतला.ईशा फाऊंडेशनने पोलिसी कारवाईच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर ज्या दोन महिलांना बंदी बनविल्याचा आरोप करण्यात आला होता, त्यांच्याशी खंडपीठाने सरन्यायाधीशांच्या दालनात ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला. यावेळी दोन्ही महिलांनी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना सांगितले की, त्या दोघीही स्वच्छेने आश्रमात राहत आहेत.मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर १ ऑक्टोबर रोजी अतिरिक्त पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली १५० पोलिसांनी जग्गी वासूदेव यांच्या कोईम्बतूर येथील आश्रमात धडक दिली होती. एस. कामराज यांनी उच्च न्यायालयात 'हेबियस कॉर्पस' याचिका दाखल करून ईशा फाऊंडेशनवर गंभीर आरोप केले होते. तसेच त्यांच्या दोन मुली गीता कामराज ऊर्फ माँ माथी (४२) आणि लता कामराज ऊर्फ माँ मायू (३९) यांना आश्रमात कोंडून ठेवण्यात आले असून त्यांना संन्यास घेण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. तसेच दोन्ही मुलींशी कुटुंबाचा संपर्क होऊ दिला जात नसल्याचेही ते म्हणाले होते.

तत्पूर्वी ३० सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत मद्रास उच्च न्यायालयाने जग्गी वासूदेव यांच्या वकिलांना प्रश्न विचारला की "जग्गी वासुदेव यांनी स्वतःच्या मुलीचे लग्न लावून दिलेले असताना ते इतर तरुणींना संसाराचा त्याग करून, केशवपन करून संन्याशांसारखे जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन का देत आहेत?" न्यायमूर्ती एस. एम. सुब्रह्मण्यम आणि न्या. व्ही. शिवाग्नम यांनी जग्गी वासूदेव यांच्या कारभारावर टीका केली. जग्गी वासूदेव यांच्याविरोधातील याचिकेत म्हटले आहे की, ईशा योग केंद्रात राहण्यासाठी सद्गुरुंकडून तरुणींचे ब्रेनवॉश केले जाते. दोन महिला स्वच्छेने त्या आश्रमात राहत आहेत, हे त्यांनी सांगितल्यानंतरही उच्च न्यायालयाने याचिका फेटाळून लावण्याऐवजी आपले कार्यक्षेत्र ओलांडून निर्णय घेतला.ईशा फाऊंडेशनने पोलिसी कारवाईच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर ज्या दोन महिलांना बंदी बनविल्याचा आरोप करण्यात आला होता, त्यांच्याशी खंडपीठाने सरन्यायाधीशांच्या दालनात ऑनलाईन पद्धतीने संवाद साधला.

त्या दोघीही स्वच्छेने आश्रमात राहत आहेत.मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर १ ऑक्टोबर रोजी अतिरिक्त पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली १५० पोलिसांनी जग्गी वासूदेव यांच्या कोईम्बतूर येथील आश्रमात धडक दिली होती.

### वासूदेव यांच्या कारभारावर टीका

एस. कामराज यांनी उच्च न्यायालयात 'हेबियस कॉर्पस' याचिका दाखल करून ईशा फाऊंडेशनवर गंभीर आरोप केले होते. त्यांना संन्यास घेण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. तसेच दोन्ही मुलींशी कुटुंबाचा संपर्क होऊ दिला जात नसल्याचेही ते म्हणाले होते.तत्पूर्वी ३० सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत मद्रास उच्च न्यायालयाने जग्गी वासूदेव यांच्या वकिलांना प्रश्न विचारला की "जग्गी वासुदेव यांनी स्वतःच्या मुलीचे लग्न लावून दिलेले असताना ते इतर तरुणींना संसाराचा त्याग करून, केशवपन करून संन्याशांसारखे जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन का देत आहेत?" न्यायमूर्ती एस. एम. सुब्रह्मण्यम आणि न्या. व्ही. शिवाग्नम यांनी जग्गी वासूदेव यांच्या कारभारावर टीका केली.

# तुम्ही कमला हॅरिस यांना मतदान करणार ना?

## अमेरिकेच्या निवडणुकीत मराठीतून आवाहन, भारतीय एकवटले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय अमेरिकन डेमोक्रेटिक फंडरेझने गुरुवारी कमला हॅरिस यांच्यासाठी खास व्हिडिओ बनवला आहे. दक्षिण आशियाई मतदारांनी कमला हॅरिस यांना मतदान करावं याकरता आशिया खंडातील विविध भाषांमध्ये कमला हॅरिस यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.**

मतदारांना आकर्षित करण्याकरता बॉलिवूड प्रेरित अनेक व्हिडिओ प्रदर्शित केले जात आहेत. कमला हॅरिस यांच्याकडे चांगला दृष्टीकोन आहे, तर ट्रम्प यांना फूट पाडायची आहे. हजारो दक्षिण आशियाई स्वयंसेवक संघटित होत आहेत. दरवाजे ठोठावत आहेत. तसंच, ही शर्यत जिंकण्यासाठी मदत करत आहेत, असं कमला हॅरिस यांच्या मोहिमेसाठी राष्ट्रीय वित्त समितीचे सदस्य अजय भुटोरिया म्हणाले.कमला हॅरिस आणच्या समुदायासाठी आनंद आणि आशा व्यक्त करतात. ५० लाखांहून अधिक भारतीय अमेरिकन यांच्यासाठी त्या आशेच्या किरण आहेत. आम्ही आमच्या समुदायाला जोडण्यासाठी बॉलिवूडच्या गाण्यांचा वापर करत आहोत, असंही भुटोरिया



म्हणाले.अजय आणि विनिता भुटोरिया यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेला हा व्हिडिओ रितेश पारीख यांनी तयार केलाय. या व्हिडिओमध्ये मराठी, तेलगू, गुजराती, पंजाबी, हिंदी, बंगाली, तमिळ, मल्याळम, उर्दू आदी दक्षिण आशियाई भाषांचा वापर केला आहे. "हमारी हॅरिस, ये कमला हॅरिस, जितेगी तो नाचो नाचो नाचो", असे गाण्याचे बोल आहेत. तर, आम्ही कमला हॅरिस यांना मतदान करणार आहोत, तुम्हीही करणार ना? असं विविध भाषांमध्ये विचारलं आहे.अमेरिकेमध्ये डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन पक्षाची पारंपरिक समर्थक राज्ये आहेत. कॅलिफोर्निया आणि न्यूयॉर्क ही राज्ये नेहमी डेमोक्रॅटिक पक्षाला मतदान करतात. तर टेक्सास सदैव रिपब्लिकनांच्या पाठीशी उभे राहते.ॲरिझोना (११) आणि नेवाडा (६) ही राज्ये स्विंग स्टेट किंवा बॅटलग्राउंड स्टेट म्हणून ओळखली जातात. कारण ती कोणत्याही उमेदवाराकडे फिरू शकतात. या बहुतेक राज्यांनी गेल्या अनेक निवडणुकांमध्ये बदलता आणि संमिश्र कौल देऊन स्विंग स्टेट म्हणून ओळख निर्माण केली आहे.

### ॲरिझोना ही राज्य खेचून आणली

गेल्या खेपेस बायडेन यांनी पेनसिल्वेनिया, व्हिस्कॉन्सिन, मिशिगन, जॉर्जिया, ॲरिझोना ही राज्य खेचून आणली आणि निवडणूक जिंकली. मतदारांना आकर्षित करण्याकरता बॉलिवूड प्रेरित अनेक व्हिडिओ प्रदर्शित केले जात आहेत.दरवाजे ठोठावत आहेत. तसंच, ही शर्यत जिंकण्यासाठी मदत करत आहेत, असं कमला हॅरिस यांच्या मोहिमेसाठी राष्ट्रीय वित्त समितीचे सदस्य अजय भुटोरिया म्हणाले.कमला हॅरिस आणच्या समुदायासाठी आनंद आणि आशा व्यक्त करतात.

# कार्तिक आर्यनला भेटायला केला ११६० कीमी प्रवास

कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. कार्तिकने चित्रपटासाठी जबरदस्त ट्रांसफॉर्मेशन केले, ज्याचे सोशल मीडियावर खूप कौतुक झाले. बॉलिवूडमधील टॉप कलाकारांपैकी एक असलेल्या कार्तिकचे फॅन फॉलोइंगही गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढले आहे. या काळात कार्तिकची क्रेझ तरुणांमध्ये वाढली अन् याचेच एक दृश्य शनिवारी मुंबईतील अभिनेत्याच्या घराबाहेर पाहायला मिळाले.कार्तिकच्या एका चाहत्याने त्याला त्याच्या घराबाहेर येऊन एक मोठं सरप्राइज दिलं आहे. उत्तर प्रदेशातील झाशी जिल्ह्यातून आलेल्या कार्तिकच्या एका चाहत्याने ११६० किलोमीटर सायकलवर प्रवास करत केवळ कार्तिकला भेटण्यासाठी मुंबई गाठली. कार्तिक आर्यननेही त्याच्या चाहत्याला निराश न करता घराबाहेर पडून तयाची भेट घेतली. यादरम्यान कार्तिकने इतर फॅन्सबरोबर फोटोदेखील काढले. कार्तिकही त्याच्या चाहत्याशी थोडा वेळ बोलला. यादरम्यान त्या तरुणाने सांगितले की, झाशीहून सायकलने मुंबईला पोहोचण्यासाठी त्याला एकूण ९ दिवस लागले.एका चाहत्याने आपल्या प्रेमाखातर इतकी भारावून टाकणारी गोष्ट केल्याचं ऐकून कार्तिकची खूप खुश





झाला. त्याने त्याची विचारपुस केली, गप्पा मारल्या. याबरोबरच त्या चाहत्याचे आभारही कार्तिकने मानले. सोशल मीडियावर कार्तिक आणि त्याच्या या अनोख्या चाहत्याचा व्हिडीओ जबरदस्त व्हायरल होत आहे. कार्तिक आर्यन सध्या 'चंदू चॅम्पियन' चित्रपटामुळे चर्चेत आहे. दिग्दर्शक कबीर खान यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. चित्रपटाच्या शूटिंगसाठी कार्तिकने आपल्या शरीरात कमालीचा बदल केला. या ट्रांसफॉर्मेशनसाठी कार्तिकने वर्षभर प्रचंड मेहनत घेतली आहे तसेच त्याने गोड पदार्थांचे सेवनही बंद केले होते. कार्तिकचे चाहते त्याच्या या आगामी चित्रपटाची आतुरतेने वाट बघत आहेत.कार्तिक आर्यन सध्या त्याच्या आगामी 'चंदू चॅम्पियन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. कार्तिकने चित्रपटासाठी जबरदस्त ट्रांसफॉर्मेशन केले, ज्याचे सोशल मीडियावर खूप कौतुक झाले. बॉलिवूडमधील टॉप कलाकारांपैकी एक असलेल्या कार्तिकचे फॅन फॉलोइंगही गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढले आहे.

## ओम शब्द आणि भगवा रंग

सध्या बॉलिवूडमध्ये ऐतिहासिक घटना किंवा वीर-पुरुषांवर बेतलेल्या चित्रपटांचा ट्रेंड पाहायला मिळत आहे. वेगवेगळे वादग्रस्त, संवेदनशील तसेच ज्वलंत विषय हे बऱ्याच नव्या दिग्दर्शकांकडून हाताळले जात आहेत. अशातच आता 'हैदराबाद मुक्ती संग्राम' यावर बेतलेल्या आगामी 'रजाकार' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतने हा ट्रेलर सादर केला असून सोशल मीडियावर याची जबरदस्त चर्चा आहे.झालेले अत्याचार आणि नरसंहार,तत्कालीन सरकारने हैदराबादसाठी घेतलेले काही कठोर निर्णय आणि एकूणच निजामाचं साम्राज्य टिकवू पाहणारी वृत्ती अशा बऱ्याच गोष्टींची झलक या ट्रेलरमध्ये पाहायला मिळत आहे.

## लियाची हुबेहुब मिमिक्री



सोशल मीडियावर असंख्य कंटेंट क्रिएटर्स आहेत. पण काही कंटेंट क्रिएटर्सनी आपल्यातल्या वेगळ्या कौशल्याने नेटकऱ्यांसह सेलिब्रिटींची मनं जिंकली आहे. त्यापैकी एक म्हणजे २४ वर्षांची कंटेट क्रिएटर चांदनी भाभदा. सोशल मीडियावर ती चांदनी मिमिक म्हणून खूप प्रसिद्ध आहे. चांदनी आलिया भट्टची हुबेहुब मिमिक्री करते. तिच्या या कौशल्याचे आलियाने देखील कौतुक केलं होतं. अशा या लोकप्रिय कंटेंट क्रिएटर चांदनी भाभदाने अक्षय कुमारच्या फ्लॅट खरेदी केल्याचं समोर आलं आहे. चांदनी भाभदाने अक्षय कुमारचा अंधेरीतला फ्लॅट खरेदी केला आहे. तिने गृहप्रवेश करतानाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. पहिल्या दोन फोटोंमध्ये चांदनी पूजा-अर्चा करताना दिसत आहे. तर तिसऱ्या फोटोमध्ये डोक्यावर कलश घेऊन गृहप्रवेश करताना चांदनी दिसत आहे. हे गृहप्रवेशाचे फोटो शेअर करत तिने लिहिलं आहे, "वयाच्या २५ वर्षांच्या आधी घर खरेदी केलं. घराचा ईएमआय भरत आहे."अवघ्या वयाच्या २४व्या वर्षी चांदनीने स्वतःचं घर घेण्याचं स्वप्न पूर्ण केल्यामुळे कलाकार मंडळींसह, इतर कंटेंट क्रिएटर्स व चाहते तिला शुभेच्छा देत आहेत. नुपूर सेनॉन, सई गोडबोले, अभिषेक निगम, असीस कौर अशा अनेकांनी चांदनीला शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, चांदनीचे इन्स्टाग्रामवर 495K फॉलोअर्स आहेत. तिने वकिलीचे शिक्षण घेतले आहे. ती व्हीजे म्हणजे व्हिडीओ जॉकी आहे. पण ती पूर्णपणे वेळ कंटेंट क्रिएटरचं काम करते.

## आमिर खानची झाली होती 'अशी' अवस्था

आमिर खानची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव सध्या तिच्या 'लापता लेडीज' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. १ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे सध्या या चित्रपटाचं प्रमोशन जोरदार सुरू आहे. अशात किरण रावने 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाच्या अपयशावर प्रतिक्रिया दिली आहे. आमिर खान व करीना कपूर अभिनीत 'लाल सिंग चड्ढा' २०२२ साली प्रदर्शित झाला होता. बॉक्स ऑफिसवर हा चित्रपटात फ्लॉप झाला. ६० कोटींची कमाई 'लाल सिंग चड्ढा'ने केली होती. या चित्रपटाच्या अपयशाचा परिणाम आमिर खानवर झाला होता.नुकतीच किरण रावने 'झूम' एंटरटेनमेंट चॅनेलला मुलाखती दिली. यावेळी ती 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाच्या अपयशाबद्दल बोलली. किरण म्हणाली, "'लाल सिंग चड्ढा' फ्लॉप होणं हे खरंच निराशाजनक होतो. जेव्हा तुम्ही खूप प्रयत्न करता आणि तरीही काम होत नाही, तसंच काहीस 'लाल सिंग चड्ढा'बरोबर झालं. या चित्रपटाच्या अपयशाचा परिणाम आमिरवर खूप जास्त झाला. एवढंच नाहीतर चित्रपटाच्या संपूर्ण टीमवर परिणाम झाला." पुढे किरण राव म्हणाली, "आमिरसाठी 'लाल सिंग चड्ढा' ड्रीम प्रोजेक्ट होता. त्याने चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी या चित्रपटाच्या स्क्रिप्टचे हक्क मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केले होते. या चित्रपटाला यश मिळण्यासाठी आमिरने प्रचंड काम केलं होतं. पण अखेर हा चित्रपट अपयशी ठरला. सोशल मीडियावर 'लाल सिंग चड्ढा'बाबत सकारात्मक प्रतिक्रिया होत्या. मात्र, शेवटी मी आमिरला वस्तुस्थिती स्वीकारण्यास सांगितलं."दरम्यान, 'लाल सिंग चड्ढा' चित्रपटात आमिर, करीना व्यतिरिक्त मोना सिंह आणि नागा चैतन्य यांनी प्रमुख भूमिका साकारली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन अद्वैत चंदनने केलं होतं. हा चित्रपट टॉम हॅंक्सच्या १९९४ सालच्या 'फॉरेस्ट गंप'चा हिंदी रिमेक होता.

## तमन्ना भाटियाची गुवाहाटी ईडी कार्यालयात चौकशी



बॉलिवूड अभिनेत्री तमन्ना भाटियाने आजवर अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. स्त्री २ या चित्रपटातल्या तिच्या गाण्यानेही लक्ष वेधलं होतं. तसंच बाहुबली सिनेमातील तिची भूमिकाही अनेकांच्या स्मरणात आहे. याच तमन्ना भाटियाच्या अडचणींमध्ये मोठी भर पडली आहे. कारण ईडीकडून तमन्नाची कसून चौकशी झाल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी तमन्नाला ईडीने समन्स धाडलं होतं. त्यानंतर तमन्नाची गुवाहाटी येथील ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली. अभिनेत्री तमन्ना  तिच्या आईसह ईडी कार्यालयात पोहचली होती. गुरुवारी दुपारी तिला चौकशीसाठी बोलवण्यात आलं. ज्यानंतर काही तास तिची चौकशी सुरु होती. नावाचं ॲप आहे याचं प्रमोशन केल्याचा आरोप तमन्नावरआहे. हे ॲप महादेव बेटिंग ॲपशी संबंधित आहे. या ॲपवर मनोरंजन क्षेत्र, क्रिकेट, पोकर, बॅडमिंटन, कार्ड गेम्स, फुटबॉल या सगळ्यासाठी बेटिंग करता येतं. या ॲपचं प्रमोशन केल्यानं तमन्ना चर्चेत आली. त्यामुळे तिच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. ती आता थेट ईडीच्या रडारवर आहे त्यामुळेच तिची गुवाहाटी येथील ईडी कार्यालयात चौकशी करण्यात आली.महादेव बेटिंग ॲप प्रकरणात आत्तापर्यंत रणबीर कपूर, श्रद्धा कपूर यांनाही समन्स पाठवलं गेलं होतं. तसंच या प्रकरणात गेल्या वर्षी कपिल शर्माचीही चौकशी झाली होती. या सगळ्यानंतर आता तमन्ना भाटियाच्या अडचणी वाढल्या आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. या प्रकरणात आत्तापर्यंत ईडीने एकूण ४१० कोटींहून अधिक मालमत्ता जप्त केल्याचीही माहिती आहे. हे एक बेटिंग ॲप आहे. त्यात अनेक प्रकारचे गेम्स आहेत ज्यावर सट्टा लावता येतो.

# विराट कोहलीने घडवला इतिहास!

## न्यूझीलंडने बंगळुरू कसोटीत केला मोठा पराक्रम

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बंगळुरू येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा केल्या. पहिल्या डावात ४६ धावांत गुंडाळल्यानंतर भारताने दुसऱ्या डावात दमदार कमबॅक केले. भारताचा सलामीने जोडीने चांगली सुरुवात करुन दिली. ज्यामुळे भारतीय संघाने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३ बाद २३१ धावा केल्या. यादरम्यान स्टार फलंदाज विराट कोहलीने मोठा पराक्रम केला. त्याने कसोटी क्रिकेटमधील ९००० धावांचा टप्पा पार केला आहे. त्याचबरोबर त्याने राहुल द्रविडचा मोठा विक्रम मोडला आहे.**



विराट कोहली तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत १०२ चेंडूत ८ चौकार आणि एका षटकारासह ७० धावा करत बाद झाला. त्याने या अर्धशतकी खेळीत अनेक मोठे विक्रम आपल्या नावावर केले. कोहलीने ५३ धावा पूर्ण करताच कसोटी क्रिकेटमध्ये ९ हजार धावा पूर्ण केल्या. कसोटीत ९००० धावा करणारा तो चौथा भारतीय फलंदाज आहे. कोहलीपूर्वी सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांनी ही मोठी कामगिरी केली होती. त्याचबरोबर सर्वात जलद ९ हजार धावा पूर्ण करणारा विराट कोहली हा चौथा भारतीय फलंदाज आहे. १९७ डावात त्याने ही विशेष कामगिरी आपल्या नावे केली आहे.या अर्धशतकी खेळीत विराट कोहलीने एक मोठा विक्रमही केला आहे. कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिसऱ्या क्रमांकावर खेळताना १५ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारा तो जगातील चौथा आणि भारताचा पहिला फलंदाज ठरला आहे. विराट कोहलीने राहुल द्रविडला मागे टाकले आणि तिसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याने या बाबतीत राहुल द्रविडला मागे टाकले आहे.भारत आणि न्यूझीलंड यांच्यात खेळला जाणारा पहिला कसोटी सामना आता अतिशय मनोरंजक टप्प्यात पोहोचला आहे. आतापर्यंत तीन दिवस उलटून गेले आहेत, पण सामन्यात फक्त दोन दिवसांचा खेळ पार पडला आहे. कारण पावसामुळे पहिल्या दिवशी एकही चेंडू टाकला गेला नाही. एकेकाळी टीम इंडिया बॅकफूटवर असल्याचे दिसत होते, पण त्यानंतर दुसऱ्या डावात भारताने दमदार पुनरागमन केले. प्रथम रोहित-यशस्वी या सलामी जोडीने दमदार सुरुवात करुन दिली. यानंतर सर्फराझ-विराटने तिसरा दिवस मार्गी लावला. पण विशेष बाब म्हणजे आज बगळुरूमध्ये जे घडले, ते यापूर्वी कधीही घडले नव्हते. म्हणजे भारतीय भूमीवर इतिहास लिहिला गेला आहे.सर्वप्रथम, त्या विक्रमाबद्दल बोलू, जो भारतात पहिल्यांदाच घडला आहे. खरे तर, जेव्हापासून भारतात कसोटी सामने सुरू झाले, तेव्हापासून एका दिवसात सर्वाधिक ४७० धावा केल्या गेल्या आहेत. आज इतक्या धावा झाल्या नाहीत, पण दुसऱ्या क्रमांकाच्या धावा नक्कीच झाल्या. पण २००९ मध्ये भारत विरुद्ध श्रीलंका सामन्यात ४७० धावा झाल्या होत्या, तेव्हा तो कसोटीचा दुसरा दिवस होता. पण आज बंगळुरू येथे भारत विरुद्ध न्यूझीलंड कसोटीत झालेल्या ४५३ धावा कसोटीच्या तिसऱ्या दिवशी पूर्ण झाल्या आहेत. म्हणजेच ही भारताची तिसऱ्या दिवसाची सर्वात मोठी धावसंख्या ठरली आहे. भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही देशांनी यामध्ये योगदान दिले आहे.याआधी नुकताच टीम इंडिया बांगलादेश विरुद्ध कानपूरमध्ये सामना खेळत असताना भारत आणि बांगलादेशने मिळून ४३७ धावा केल्या होत्या. हा विक्रम सामन्याच्या चौथ्या दिवशी झाला होता. आता तो विक्रमही मोडीत निघाला आहे. म्हणजेच भारतात दोन बॅक टू बॅक मॅचेसमध्ये नवे रेकॉर्ड तयार नोंदवले गेले आहेत. याआधी भारतात कसोटीच्या तिसऱ्या दिवशी सर्वात मोठी धावसंख्या २०१३ मध्ये नोंदवली गेली होती. तेव्हा भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात मोहाली येथे झालेल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दोन्ही संघांनी ४१८ धावा केल्या होत्या. अशाप्रकारे तिसऱ्या दिवशीच्या सर्वाधिक धावसंख्येचा विक्रम जवळपास ११ वर्षे जुना होता.आता या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर टीम इंडियाने चांगले पुनरागमन केले होते.

### न्यूझीलंडने 402 धावा केल्या

पण तिसऱ्या दिवसाच्या शेवटच्या चेंडूवर विराट कोहली बाद झाल्यामुळे संपूर्ण खेळाचा शेवट गोड होऊ शकला नाही. भारतीय संघाने दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३ बाद २३१ धावा केल्या आहेत. विराट कोहलीला शेवटच्या चेंडूवर ग्लेन फिलिप्सने बाद केले. यामुळे टीम इंडियाच्या सामना जिंकण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. कोहलीने १०२ चेंडूत ७० धावांची शानदार खेळी केली. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बंगळुरू येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडने पहिल्या डावात ४०२ धावा केल्या.

# पाकिस्तानने पुनरागमनासह इंग्लंडचा उडवला धुव्वा

## अलीने ११ विकेट घेत लाजिरवाण्या पराभवाचा घेतला बदला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तान क्रिकेट संघाने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत संघ बदलला आणि विजयाचा दुष्काळही संपवला. पाकिस्तान संघाने दुसऱ्या कसोटीत इंग्लंडवर तब्बल १५२ धावांनी मोठा विजय नोंदवला आहे. पाकिस्तानचे दोन गोलंदाज नोमान अली आणि साजिद खान यांनी इंग्लंडच्या फलंदाजांचे कंबरडे मोडले. पाकिस्तानच्या विजयात या दोघांनी मोठी भूमिका बजावत दोन्ही डावांमध्ये २० विकेट घेतले.**





मुलतान येथे खेळल्या गेलेल्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानने अवघ्या ४ दिवसांत इंग्लंडचा पराभव केला. पाकिस्तानच्या विजयाचा नायक त्यांचा फिरकी गोलंदाज ठरले. ज्यांनी सर्व २० विकेट घेतल्या. या शानदार विजयासह पाकिस्तानची १३३८ दिवसांची विजयाची प्रदीर्घ प्रतीक्षाही संपुष्टात आली. पाकिस्तानने ११ पराभवांनंतर अखेरीस विजय मिळवला आहे. मुलतानमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानने इंग्लंडसमोर विजयासाठी २९७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडच्या फलंदाजांनी मुलतानच्या खेळपट्टीवर पाकिस्तानच्या फिरकीपटूंसमोर शरणागती पत्करली. एकट्या नोमान अलीने इंग्लंडच्या ८ फलंदाजांना तंबूत धाडले. त्यामुळे संपूर्ण इंग्लंडचा संघ १५० धावाही करू शकला नाही. मुलतान कसोटीत पाकिस्तानचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. बाबर आझमच्या जागी आलेल्या कामरान गुलामच्या शतकाच्या जोरावर त्यांनी पहिल्या डावात ३६६ धावा केल्या आणि संघात दणक्यात पदार्पण केले.

### साजिद खानच्या फिरकीची कमाल

पाकिस्तानी फिरकीपटूंच्या जाळ्यात एकामागून एक पाकिस्तानी फलंदाज अडकले. नोमान अली आणि साजिद खान यांनी मिळून दोन्ही डावात इंग्लिश फलंदाजांना फार काळ मैदानात टिकू दिले नाही. पहिल्या डावात साजिद खानने ७ आणि नोमान अलीने ३ विकेट घेतले, तर दुसऱ्या डावात नोमान अलीने ८ तर साजिदने २ विकेट घेतले. म्हणजेच २० पैकी नोमान अलीने ११ तर साजिद खानने ९ विकेट घेतल्या.